| | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,<br>ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>मो.क्र.9819208279 | |
|---|---|---|

**प्रेसनोट** **दि.०५.११.२०२४**

## भिवंडीतुन मोठया प्रमाणावर बेकायदेशिर रोख रक्कम जप्त

दिनांक ४/११/२०२४ रोजी १९.१० वा.चे सुमारास सहाय्यक पोलीस आयुक्त, भिवंडी पुर्व श्री.सचिन सांगळे, शांतीनगर पोलीस ठाणे येथील सपोनि/घोलप, पोशि/२४८८ चव्हाण, चालक पोशि/५५९ लोखंडे हे बंदोबस्त डयुटी करीत असताना, धामणकर नाका ते मानकोली कडे जाणारी एमएच ४३ बीपी ७९२० टाटा योद्धा सीएमएस कंपनीची गाडी जात असताना सदर गाडी थांबवुन गाडी चालकाकडे चौकशी केली असता, सदर गाडीमध्ये रोख रक्कम असल्याचे गाडीचा चालक महेंद्र पांडे यांनी सांगितले. तसेच सदर रोख रक्कमे बाबत कोणतेही कागदपत्र त्याच्याकडे नसल्याचे त्याने सांगितले.

त्यावरून सदर गाडी स पो आ कार्यालय, पूर्व विभाग, भिवंडी येथे आणण्यात आली व त्यानंतर एफ.एस.टी.क्रमांक ६,१३७ भिवंडी पूर्व विधानसभा चे पथक, सहाय्यक खर्च निरीक्षक श्री.शरद यादव, एमसीसी नोडल ऑफिसर श्री.गुरव तसेच आयकर निरीक्षक श्री.पवन कौशिक यांना तात्काळ माहिती देऊन सदर ठिकाणी पाचारण केले व सर्वांसमक्ष सदर गाडीचा पंचनामा केला असता गाडीमध्ये एकूण २,३०,१७,६००/- इतकी रोख रक्कम मिळुन आली. सदर रक्कमे बाबत कोणतीही कागदपत्रे गाडी चालकाकडे नसल्यामुळे सदरची रक्कम जप्त करून ती पुढील कारवाईसाठी आयकर विभाग यांचे ताब्यात देण्यात आली असुन पुढील कारवाई चालू आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर